सदर दिनांक : ०५/०१/२०१८.
नोंदणी दिनांक : ०५/०१/२०१८.
निर्णय दिनांक : ०८/०६/२०१८.
कालावधी : ०० वर्षे, ०५ महिने, ०३ दिवस.
निशाणी क्रमांक : ३२.

# कोर्ट विदयमान न्यायाधिश, सहकार न्यायालय,जळगांव.

**( श्रीमती.आर.एस.शेख न्यायाधीश यांचे समोर)**

---

**विवाद क्रमांक : जे/०१/२०१८.**

**वादी :** सुभाष चौक अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लिमिटेड,जळगांव.
पत्ता - ९, नवी पेठ, श्री. प्लाझा, दुसरा मजला, जळगांव,ता.जि.जळगांव,
तर्फे व साठी **श्री.गोपाल प्रतापसिंग पाटील,**
वय ४०, धंदा - नोकरी, रा.जळगांव.

*विरुध्द*

**प्रतिवादी :** **१. श्री.मुरलीधर मुकूंदा वाणी,**
वय - ४९, धंदा - व्यापार,
पत्ता - १. मकडया मारोती चौक,
शांतीनाथ पतसंस्थेजवळ,पारोळा,
ता.पारोळा,जि.जळगांव.
२. स्वामी नारायण कॉलनी,म्हसवे शिवार,
पारोळा,ता.पारोळा,जि.जळगांव.

**२. सौ.वैशाली विलास देव (वाणी)**
वय - ४२, धंदा - शेती व घरकाम,
रा.गांवठाणपुरा, मु.पो.पिंपळगांव हरेश्वर,
ता.पाचोरा,जि.जळगांव.

**३. श्री.मनोज बापू वाणी,**
वय - ३८, धंदा - व्यापार,
रा.पाठक गल्ली, पारोळा,ता.पारोळा,जि.जळगांव.

**विवाद : रक्कम रुपये ३,७७,१६१/- वसुलीसाठी.**

वादी तर्फे वकिल : शैलेश पी.जैन.
प्रतिवादी क्रमांक १ ते ३ : एकतर्फा.

**: न्यायनिर्णय :**

**( घोषित दिनांक : ०८/०६/२०१८)**

१. प्रस्तुत विवाद रक्कम रुपये ३,७७,१६१/- वसुलीसाठी व त्यावर द.सा.द.शे.१९ टक्के भविष्य व्याज मंजूर होउन मिळणेकामी दाखल आहे.

## : विवादातील कथन खालीलप्रमाणे :

२. वादी संस्थेची केस अशी की, वादी संस्था महाराष्ट्र सहकार कायदा, १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. वादी संस्थेने प्रतिवादी १ यास रूपये ३,००,०००/- चे कर्ज मंजूर करून वाटप केले. सदर कर्जास प्रतिवदी क्रमांक २ व ३ हे जामीनदार राहीले. प्रतिवादींनी कर्जापोटी वादी संस्थेच्या लाभात कर्ज मागणी अर्ज, कर्जरोखा, वचनचिठ्ठी व कर्ज मिळाल्याची पावती इत्यादी आवश्यक दस्त करुन दिले. तर प्रतिवादी क्रमांक २ यांने सदर कर्जासाठी दिनांक १७/११/२०१५ रोजी नोंदणीकृत गहाणखत वादी संस्थेस करून दिले. कर्जाची परतफेड ६० महिन्याच्या कालावधीत त्रैमासिक हप्त्यात वादीस परतफेड द.सा.द.शे.१७ टकके व्याजदराने करावयाची होती. तर कर्ज थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर द.सा.द.शे.२ टकके दराने दंडव्याज आकारायचे होते.

३. वादी संस्थेची पुढे केस अशी की, प्रतिवादी १ ने ठरल्याप्रमाणे कर्ज रक्कमेची परतफेड केली नाही. प्रतिवादी १ कडे खातेउतारा-यानुसार दिनांक २०/११/२०१७ अखेर विवाद रक्कम रुपये २,८२,१९३/- येणेबाकी आहे. वादी संस्थेने प्रतिवदींना अनेक वेळा कर्ज रक्कमेची परतफेडीची मागणी केली. परंतू प्रतिवादीने कर्जाची परतफेड केली नाही. वादी संस्थेच्या मते, विषयांकीत कर्ज रक्कम परतफेडीची सर्व प्रतिवादींची वैयक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे. वरील सर्व मुददयांच्या आधारावर वादी संस्थेने विवादाचा निवाडा मागणीप्रमाणे तिचे लाभात पारीत करावा, अशी विनंती केलेली आहे.

४. संचिकेचे अवलोकन करता, विवादाची नोटीस प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेवर तामिल होवूनसुध्दा ते विवादात गैरहजर राहीले. त्यामुळे विवाद प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे विरुध्द ***एकतर्फा*** चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

५. वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक २ याची तारण मिळकत जप्त करण्यासाठी निशाणी क्रमांक ५ वर अर्ज विवादात दाखल केला. प्रतिवादी क्रमांक २ याला निशाणी ५ ची नोटीस तामिल होउनही तो विवादात गैरहजर राहीला. त्यामुळे वादीच्या वकीलांचे म्हणणे ऐकून घेवून निशाणी क्रमांक ५ चे अर्जावर दिनांक २८/०२/२०१८ रोजी आदेश पारित करण्यात आला.

६. विवादाची मागणी सिध्द करणेकामी वादी संस्थे तर्फे **निशाणी १३ वर गोपाल प्रतापसिंग पाटील** यांचा पुरावा सादर करण्यात आलेला आहे. तर विवादाचे पृष्टयर्थ वादीने निशाणी २ व १४ चे दस्त यादीसोबत कागदपत्रे सादर केलेली आहेत. निशाणी ३१ नूसार वादी संस्थेने तिचा पुरावा बंद घोषित केलेला आहे.

७. वादी वकिलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. विवादात दाखल दस्तऐवजांचे अवलोकन करण्यात आले.

८. विवादात दाखल निशाणी १५ कर्ज मागणी अर्ज, निशाणी १६ रक्कम मिळाल्याची पावती, निशाणी १७ कर्जरोखा, निशाणी १८ करारनामा, निशाणी १९ वचनचिठ्ठी, निशाणी २० प्रतिज्ञापत्र, निशाणी २१ हमीपत्र, निशाणी २२ जामीनदाराचा जामिननामा व निशाणी २३ नोंदणीकृत गहाणखत इत्यादी आहेत. सदर दस्त विवादीत कर्ज संबंधाने असून त्यावर प्रतिवादींच्या सहया आहेत. वादी साक्षीदार यांचा पुरावा विवादातील कथनाशी सुसंगत असा आहे. त्याचे साक्षीस प्रतिवादीतर्फे शह देण्यात आलेला नाही. निशाणी १७ वरील कर्जरोखानूसार कर्जाचा मान्य व्याजदर द.सा.द.शे.१७ टकके आहे व दंडव्याज दसादशे २ टकके इतका नमूद आहे. त्यामुळे वादी दसादशे १९ टकके दराने व्याजाप्रमाणे वसुल करण्यास वादीस अधिकार आहे. निशाणी २९ वरील खातेउतारा पाहता, प्रतिवादी १ कडे विवाद रक्कम रुपये ३,७७,१६१/- येणे बाकी दर्शविलेली आहे.

९. वरील सर्व दस्तांचे हजेरीत वादी साक्षीदाराची साक्षी ही स्विकृत होणेस पात्र अशी आहे.

१०. सबब वरील सर्व चर्चा, विवादात दाखल उपरोक्त दस्त व वादी साक्षीदाराची निर्विवाद साक्ष विचारात घेता,मी असे गृहीत धरले की, प्रतिवादी १ याने वादी संस्थेकडून रुपये ३,००,०००/- चे कर्ज उचल केले व त्यास प्रतिवादी क्रमांक २ व ३ जामिनदार राहीले व प्रतिवादींनी उपरोक्त दस्त वादीचे लाभात करुन दिले. सबब मी असेही गृहीत धरले की, प्रतिवादी १ कडे रक्कम रुपये ३,७७,१६१/- येणे बाकी असून सदर बाकी मुळ कर्ज रक्कम रूपये ३,००,०००/- वर द.सा.द.शे.१९ टकके व्याजदराने परतफेडीची प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांची वैयक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे.

११. वरील सर्व चर्चा विचारात घेता, मी या निर्णयाप्रत आले आहे की, वादी संस्थेचा विवाद खर्चासह अंशत: मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## : **आदेश** :

१. वादी संस्थेचा विवाद खर्चासह अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ ला आदेशित करण्यांत येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ३,७७,१६१/- व बाकी मुळ कर्ज रक्कम रूपये ३,००,०००/- वर द.सा.द.शे.१९ टकके व्याजदराने विवाद दाखल तारखेपासून ते रक्कमेची पुर्ण परतफेड होईपावेतो होणारी रक्कम वादी संस्थेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या परतफेड करावी.

३. वादी संस्थेला मुभा आहे की, ती विवादीत कर्ज रक्कम वसुली करीता कायदयानुसार प्रतिवादी क्रमांक २ च्या तारण मालमत्त्वेर संस्थेचा बोजा लावून मालमत्ता जप्त करून विक्री करू शकते.

३. येणेप्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

४. न्यायदान कक्षात घोषित.

ठिकाण : जळगांव.

दिनांक : ०८/०६/२०१८.

( श्रीमती.आर.एस.शेख )
न्यायाधिश,
सहकार न्यायालय,जळगांव

सदर दिनांक : ०५/०१/२०१८.
नोंदणी दिनांक : ०५/०१/२०१८.
निर्णय दिनांक : ०८/०६/२०१८.

# कोर्ट विदयमान न्यायाधिश, सहकार न्यायालय,जळगांव.

**(श्रीमती.आर.एस.शेख न्यायाधीश यांचे समोर)**

---

**विवाद कमांक : जे/०१/२०१८.**

**वादी :** सुभाष चौक अर्बन को-ऑप.केडिट सोसायटी लिमिटेड,जळगांव.
पत्ता - ९, नवी पेठ, श्री. प्लाझा, दुसरा मजला, जळगांव,ता.जि.जळगांव,
तर्फे व साठी **श्री.गोपाल प्रतापसिंग पाटील,**
वय ४०, धंदा - नोकरी, रा.जळगांव.

*विरुध्द*

**प्रतिवादी : १. श्री.मुरलीधर मुकूंदा वाणी,**
वय - ४९, धंदा - व्यापार,
पत्ता - १. मकडया मारोती चौक,
शांतीनाथ पतसंस्थेजवळ,पारोळा,
ता.पारोळा,जि.जळगांव.
२. स्वामी नारायण कॉलनी,म्हसवे शिवार,
पारोळा,ता.पारोळा,जि.जळगांव.

**२. सौ.वैशाली विलास देव (वाणी)**
वय - ४२, धंदा - शेती व घरकाम,
रा.गांवठाणपुरा, मु.पो.पिंपळगांव हरेश्वर,
ता.पाचोरा,जि.जळगांव.

**३. श्री.मनोज बापू वाणी,**
वय - ३८, धंदा - व्यापार,
रा.पाठक गल्ली, पारोळा,ता.पारोळा,जि.जळगांव.

**विवाद : रक्कम रुपये ३,७७,१६१/- वसुलीसाठी.**

ज्याअर्थी १९६१ चा कायदा कलम २४ चे कलम ९१ अन्वये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन निकाल करण्याचे आहे.

त्याअर्थी मी, श्रीमती.आर.एस.शेख, न्यायाधीश, सहकार न्यायालय, जळगांव वरील पक्षकारास समन्से करुन आणि दाव्याची योग्य चौकशी अलहिदा नोंदवून ठेवलेल्या कारणावरुन असे कळविते की,

## : निवाडा :

१. वादी संस्थेचा विवाद खर्चासह अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ ला आदेशित करण्यांत येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ३,७७,१६१/- व बाकी मुळ कर्ज रक्कम रूपये ३,००,०००/- वर द.सा.द.शे.१९ टक्के व्याजदराने विवाद दाखल तारखेपासून ते रक्कमेची पुर्ण परतफेड होईपावेतो होणारी रक्कम वादी संस्थेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या परतफेड करावी.

३. वादी संस्थेला मुभा आहे की, ती विवादीत कर्ज रक्कम वसुली करीता कायदयानुसार प्रतिवादी क्रमांक २ च्या तारण मालमत्त्वेर संस्थेचा बोजा लावून मालमत्ता जप्त करून विक्री करू शकते.

**विवाद खर्च**

| | | |
|---|---|---|
| १. | दाव्यावरील मुद्रांक/कोर्ट फी चलन | : रुपये ४,७००/- |
| २. | दाव्यासाठी चलन फी | : रूपये ५००/- |
| ३. | प्रोसेस फी | : -- |
| ४. | वकील फी | : रुपये ३००/- |

**ठिकाण : जळगांव.**

**दिनांक : ०८/०६/२०१८.**

**( श्रीमती.आर.एस.शेख )**
**न्यायाधिश,**
**सहकार न्यायालय,जळगांव**